राज्यातील दुष्काळी भागात सुरू असलेल्या जनावरांच्या चारा छावण्या दिनांक ३० जून २०१९ च्या पुढे चालू ठेवण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०१९/प्र.क्र. ३० /म-७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४००.०३२
दिनांक : २६ जून, २०१९.

संदर्भ :- १. महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१८ / प्र.क्र.८९ / म-७, दि. ३१.१०.२०१८.
२. महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१८ / प्र.क्र.८९ / म-७, दि. ०६.११.२०१८.
३. महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१८ / प्र.क्र.८९ / म-७, दि. ०८.०१.२०१९.
४. शासन निर्णय, महसुल व वन विभाग,क्र.: सीएलएस २०१५/प्र.क्र.४०/म-३, दि. १३.०५.२०१५
५. शासन निर्णय, महसुल व वन विभाग,क्र.: एससीवाय २०१९/प्र.क्र. ३० /म-७, दि. २५ .०१. २०१९

प्रस्तावना -

राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे त्या भागातील पशुधनासाठी आवश्यक असणारा चारा व पाणी उपलब्धतेबाबतचा गंभीर प्रश्न नजीकच्या कालावधीत निर्माण होण्याची शक्यता असल्याने, दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये जनावरांच्या चारा छावण्या उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २(२६) नुसार , जनावरांच्या छावण्या दि. ३० जून, २०१९ पर्यंत चालू ठेवण्यात याव्यात. ही मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर २०१९ च्या खरीप मोसमात झालेले पर्जन्यमान व चाऱ्याची झालेली उपलब्धतता विचारात घेवून चारा छावण्या चालू ठेवण्याबाबत आढावा घेण्यात यावा असे स्पष्ट करण्यात आले आहे. मान्सूनचे विलंबाने झालेले अगमन व त्यामुळे चारा उपलब्ध होण्यासाठी कालावधी लागणार असल्याने सुरू करण्यात आलेल्या जनावरांच्या चारा छावण्या पुढे चालू ठेवण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सन २०१९ मधील मान्सूनचे विलंबाने झालेले आगमन विचारात घेवून जनावरांसाठी चारा उपलब्ध होण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने राज्यात दुष्काळी भागात जनावरांना चारा व पाणी उपलब्ध होण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या चारा छावण्या दिनांक ३० जून,२०१९ च्या पुढे समाधानकारक पाऊस होवून जनावरांसाठी चारा उपलब्ध होईपर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. च्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार जनावरांच्या छावण्या उघडण्यास खालील नमुद अटींच्या अधिन राहून शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. याव्यतिरिक्त जनावरांच्या चारा छावण्यासंदर्भात पूर्वीच्या अटी व शर्ती कायम राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०६२६१११६५६८६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.06.26 11:25:21 +05'30'

(सु. ह.उमराणीकर)
उपसचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव , मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मा.विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य,
४. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास व जसंधारण विभाग, मुंबई
९. आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
१०. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे
११. विभागीय आयुक्त (सर्व)
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व)
१४. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
१५. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व) (प्रशासकीय विभागामार्फत)
१६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) (प्रशासकीय विभागामार्फत)

१७. वित्तिय सल्लागार व सहसचिव, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई
१८. संचालक , माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१९. मा.मंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२०. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२१. मा. राज्यमंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२२. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२३. मदत व पुनर्वसन विभागातील कार्यासने (क्रमांक ३ /११ /आव्यप्र-१)
२४. निवड नस्ती, म-७